<u>निवृत्ती वेतनधारकांना ओळखपत्र देणेबाबत</u>.

महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.५९/समन्वय कक्ष,

ग्राम विकास विभाग,

बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई -४०० ००१.

दिनांक : १३ ऑक्टोबर, २०१७.

वाचा -

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.१८३/१८ (र. व का.) , दि. २३ फेब्रुवारी, २०१७.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण २०१६/प्र.क्र.१८३/१८ (र. व का.), दि. २३ जून, २०१७.

शासन परिपत्रक:-

१. शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या लाभांसाठी संबंधित कार्यालयात ये-जा करावे लागते. सेवानिवृत्तीनंतर निवृत्तिवेतनाबाबतची कार्यवाही विहित मुदतीत होण्यासाठी व शासकीय रुग्णालयातील औषधोपचार, जेष्ठ नागरिक म्हणून रेल्वे, बँका इ. ठिकाणी उपयोग करण्यासाठी तसेच शासकीय सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी म्हणून त्यांना समाजात सन्मानाची वागणूक मिळण्याच्यादृष्टीने सेवा निवृत्तिवेतनधारकांना कायमस्वरूपी फोटोसह ओळखपत्र देण्यासाठी संदर्भाधीन क्र.-१ - शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण -२०१६ / प्र. क्र. - १८३/१८ (र. व का.), दि. २३ फेब्रुवारी, २०१७ अन्वये सामान्य प्रशासन विभागाने सूचना दिल्या आहेत.

२. तसेच संदर्भाधीन क्र.-२ - शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण -२०१६ / प्र. क्र. - १८३/१८ (र. व का.), दि. २३ जून, २०१७ अन्वये निवृत्तिवेतनधारकांना फोटोसह कायमस्वरूपी ओळखपत्र देण्यासंदर्भात ओळखपत्राचा नमुना विहित केलेला आहे.

३. याबाबत ग्रामविकास विभागाची आस्थापना शाखा (खुद्द) तसेच विभागाच्या अधिनस्त सर्व कार्यालये यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) ग्रामविकास विभागाची आस्थापना शाखा (खुद्द) तसेच विभागाच्या अधिनस्त सर्व कार्यालये यांनी त्यांचे अधिनस्त शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत ते पद नमूद करून संबंधित प्रशासकीय कार्यालयाने सेवा निवृत्तिवेतनधारकांना कायमस्वरूपी फोटोसह ओळखपत्र द्यावे.

२) सेवा निवृत्तिवेतनधारकांना फोटोसह कायमस्वरूपी ओळखपत्र संदर्भाधीन क्र. २ येथील शासन परिपत्रकान्वये विहित केलेल्या नमुन्यात देण्यात यावे.

३) पदनाम नमूद करताना त्याआधी **"सेवानिवृत्त"** असा उल्लेख न चुकता करावा.

४) ओळखपत्र निर्गमित करण्यापूर्वी ओळखपत्राच्या मागील बाजूस संबंधित कार्यालयाच्या शिक्क्याची मोहोर उमटवावी.
५) तसेच सदर ओळखपत्र देण्यापूर्वी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे सेवेत असतानाचे ओळखपत्र संबंधित कार्यालयाकडे जमा केलेले आहे, याची खातरजमा करण्यात यावी. तसेच या प्रयोजनासाठी येणारा खर्च संबंधित कार्यालयांनी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०१३११२६४९४६२० असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Dattatraya Shinde

Digitally signed by Vijay Dattatraya Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fabf0ce38fdf553beb949764920592a97832b6399cb7060200d032e127e455f1, cn=Vijay Dattatraya Shinde
Date: 2017.10.13 15:57:58 +05'30'

(वि.द.शिंदे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व),
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३. उप सचिव (आस्थापना-१), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
४. निवड नस्ती - समन्वय कक्ष, बांधकाम भवन, मुंबई.